**Government of Maharashtra**
Commissionerate of Education,
Maharashtra State Central Building,
Dr. Annie Besant Road, Pune - 411 001

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन,**
शिक्षण आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, मध्यवती इमारत,
डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे ४११ ००१

प.क्र.शिआ/पवित्र प्रणाली/प्राथ/क/१०६/ 7039

दिनांक : १८/१२/२०१८

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी/मुख्याधिकारी/प्रशासन अधिकारी,
नगरपालिका/नगरपरिषदा/कटकमंडळे, सर्व.

**विषय : बिंदूनामावली तपासणीकरिता कृति आराखडा...**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थासह खाजगी व्यवस्थापनाच्या (अल्पसंख्याक संस्था वगळून) अनुदानित, अंशतः अनुदानित, अनुदानास पात्र विनाअनुदानित शाळा व विनाअनुदानित शाळामधील शिक्षण सेवक भरती प्रक्रीया ही अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीतील गुणांच्या आधारे करण्याचा दि.२२.६.२०१७ च्या शासन निर्णयानुसार शासनाने निर्णय घेतलेला आहे. सदर शिक्षण सेवक भरती पवित्र या संगणकीय प्रणालीमार्फत करण्यात येणार आहे.

सदर भरती प्रक्रीयेपूर्वी सामाजिक व शैक्षणिक मागासवर्गासाठी नुकत्याच घोषित झालेल्या १६ टक्के आरक्षणानुसार बिंदू नामावली अद्ययावत करणे आवश्यक आहे. त्यानुसार आपल्या आस्थपनेवरील शाळा यांच्या बिंदू नामावली अद्ययावत करणे, तपासणी करणे व सदर तपासलेली बिंदू नामावली मागासवर्ग कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय यांचेकडून पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी दिलेल्या समक्ष सूचनांनुसार दि.२२.१२.२०१८ पर्यंत बिंदू नामावली अद्ययावत करणे व तपासणी करुन मागासवर्ग कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय यांचेकडे पडताळणीसाठी सादर करणेबाबत आदेशित केले आहे. सदर कालमर्यादा व उपलब्ध असलेला अत्यल्प कालावधी विचारात घेता आपल्या आपल्या आस्थापनेवरील सर्व बिंदू नामावली दि.२२.१२.२०१८ पूर्वी अद्ययावत व तपासणी करुन पडताळणीसाठी मागासवर्ग कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय यांचेकडे पडताळणीसाठी सादर करण्याबाबत योग्य ते नियोजन करण्यात यावे. वरील कालमर्यादा विचारात घेऊन मा.विभागीय आयुक्तांनाही तातडीने बिंदू नामावली पडताळणी करण्याच्या दृष्टीने विनंती करण्यात आलेली आहे. वरीलप्रमाणे विहित कालमर्यादित कार्यवाही पूर्ण करावी.

**(विशाल सोळंकी, भा.प्र.से.)**
आयुक्त (शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत : अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव
प्रत : शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, पुणे
प्रत : शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, पुणे
प्रत : विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व
प्रत : शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषदा,सर्व.